# || श्री गणपति अथर्वशीर्ष ||



सुलभ अर्थ व विवेचन

अनिल सोहोनी
चिन्मय मिशन साधक

# अनुक्रमणिका

अर्पण पत्रिका . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ५

प्रास्तविक . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ६

अथर्वशीर्षम् . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ९

शांतिपााठ . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .११

ॐ नमस्ते गणपतये . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .१२

त्वमेव प्रत्यक्षन् तत्त्वमसि . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .१३

त्वमेव केवलं कर्तासि त्वमेव केवलं धर्तासि . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .१३

ऋतम् वच्मि सत्यम् वच्मि . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .१५

अव त्वं माम् अव वक्तारम् अव श्रोतारम् . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .१६

अव पश्चात्तात् अव पुरस्तात् अवोत्तरात्तात् अव दक्षिणात्तात् . . . . . . . . . . . . . .१९

त्वम् वाङ्मय त्वम् चिन्मयः त्वम् आनन्दमयः . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .१९

सर्वम् जगदिदन् त्वत्तो जायते सर्वम् जगदिदन् त्वत्तस्तिष्ठति . . . . . . . . . . . . . . . . २0

त्वम् भूमि आपः अनलः अनिलः नभः . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .२१

पंचमहाभूतांची उत्पत्ति . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २२

सूक्ष्म महाभूतांच्या तम मात्रेचे पंचीकरण व त्यांची उत्क्रांति . . . . . . . . . . . . . . . . २३

मूलभूत सत्व व रज पंचमहाभूतांची उत्क्रांति . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २३

त्रिगुणाच्या सत्व  तम व रज ह्या तिन्ही गुणाची एकत्रित उत्क्रांति  . . . . . . . . . . . . . २४

त्वं गुणत्रयातीतः त्व अवस्थात्रयातीतः त्वं देहत्रयातीतः  त्वं कालत्रयातीतः  . . . . . . . . . २६

त्वं ब्रह्मा त्वं विष्णु त्वं रूद्र त्वं इन्दं त्वं अग्नि त्वं वायुः  . . . . . . . . . . . . . . . . . २८

गणादिं पूर्वमुच्चार्य वर्णादिस्तदनन्तरम् अनुस्वारः परतरः  . . . . . . . . . . . . . . . . . २८

गकारः पूर्वरूपम् अकारः मध्यमरूपम् अनुस्वारः च अन्त्य रूपम्  . . . . . . . . . . . . . . २९

ओंकार व गणपतिचे प्रतिकात्म रूप कसे साकारते  - वैज्ञानिक दृष्टिकोन . . . . . . . . . . ३0

श्री ज्ञानेश्वरजींना दिसलेले गजाननाचे रूप . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ३५

ॐ गं गणपतये नमः एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डायधीमहि तन्नो दन्ती प्रचोदयात् . . . . . . .३६

एकदन्तं चतुर्हस्तं पाशमङ्कुशधारिणम् रदं च वरदौ हस्तैर्बिभ्राणम् मूषकध्वजम् . . . . . . . . .३६

नमो व्रातपतये नमो गणपतये नमः प्रमथपतये नमस्तेऽअस्तु लम्बोदराय  . . . . . . . . . . . ३७

उपसंहार . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ३९

## मनोगत...

आज जगात सर्व ठिकाणी मान्यता पावलेला आणि सर्वाधिक प्रमाणात पूजला जाणारा देव म्हणजे श्री गजानन. भारतात तर कुलदैवत कोणतेही असले तरी घरोघर श्री गणेशाचे पूजन केले जातेच. सर्व कार्यारंभी पूजला जाणारा हा ओंकारस्वरूप आदिदेव विघ्नहर्ता सुखकर्ता व दुःख निवारण करणारा विद्येचा देव आहे. कोणत्याही शुभकार्याच्या आरंभी याचे पूजन केल्याने कार्य सिद्धि होते अशी श्रद्धा आहे.

हे स्तोत्र नित्यनेमाने म्हणत असताना आठवले की सद्गुरू श्री चिन्मयानंदजींनी आपल्या कानांवर गेली तीन शतके गीता उपनिषदे आणि इतर अनेक प्रकरण ग्रंथ घातले आहेत. आता आपण अथर्वशीर्षाचा अभ्यास करून लिखाण करावे. हीच गजानाची अक्षर पूजा होईल.

एक नमूद करावेसे वाटते की ह्या चिंतनात माझे स्वतःचे असे काही नाही. सर्व काही सद्गुरूंची कृपा आहे. हे चिंतन मी केवळ संकलन करून माझ्या शब्दात मांडले आहे एवढेच. शिवाय ...

आपुलिया बळे नाही मी बोलत | सखा कृपावंत वाचा त्याची |
साळुकी मंजूळ बोलतासे वाणी | बोलवीता धनी वेगळाची ||
काय म्या पांमरे बोलावी उत्तरे | परि त्या विश्वंभरे बोलविले |
तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा | वागवी पांगुळा पायावीण ||
संत तुकाराम

ह्या अक्षर पूजेचा आनंद सर्व गजानन भक्तांना प्राप्त व्हावा हेच खरे मनोगत ...

अनिल सोहोनी

चिन्मय मिशन साधक

# अर्पण पत्रिका

## सद्गुरू श्री चिन्मयानंदजी यांचे चरणी

भरोनी सद्भावाची अंजुळी |
मियां वोंविया फुलें मोकळी |
अर्पिलीं अंघ्रियुगुलीं |
विश्वरूपाच्या |

# प्रास्तविक

सुख प्राप्ति आणि दुःख निवृत्ती ह्या दोन गोष्टींसाठीच सर्व सजीवांची निरंतर धडपड चालू असते. अनुकूल संवेदना म्हणजे सुख आणि प्रतिकूल संवेदना म्हणजे दुःख ही सुखदुःखाची व्यारव्या.

मनुष्येतर योनी मध्ये मन पूर्ण विकसित नसल्याने केवळ शरीराच्या पातळीवरील अनुकूलता हे त्याचे सुख व प्रतिकूलता हे दुःख असते. मानवाचे तसे नसते अनुकूल व प्रतिकूल ह्या कल्पना त्याच्या मनोकलावर अवलंबित असतात. मानवाचे मन मानवेतर पशुपक्षांच्या पेक्षा अधिक विकसित असलाने प्रत्येक मनुष्या गणीत विविध इच्छा आकांक्षा त्याचा मनोकल गुंतागुतीचा करतात. अधिकतर मानव प्रतिकूल परिस्थिति मूळे दुःखी होतो. मन जर राजसिक सुखाच्या कल्पनेने किंवा कृर वा हीन इच्छेने व्याप्तिमूळे त्याची दुःखे अती दारूण होतात तो हतबल होतो.

अशा बिकट परिस्थितीत जर त्याने दुःख हरण करणारा व सुख देणारा अशा गजाननाची श्रध्देने उपासना केली तर तो सुखी तर होईल आणि त्याची मनोवृत्ती सात्विक होईल.

भगवद् गीतेत श्री व्यासांनी सत्व रज तम गुणांचे वर्णन आणि परिणाम सांगितले आहेत त्याचे संक्षिप्त रूपात तक्ता देत आहोत. भाविकांनी कृपया जरूर अभ्यासावा. तामसिक आणि राजसिक वृत्ति पेक्षा सात्विक वृत्ति मधे वासना शुद्ध असतात. सात्विक वृत्तिच्या माणसाची दुःखे सौम्य असतात. तो ईश्वराभिमुख असल्याने उपासनेने त्याची संकटे व क्लेश कमी होतात.

| विषय | सात्त्विक | राजसिक ← | तामसिक ← |
|---|---|---|---|
| **ज्ञान** | नामरूपात्मक जगतात एकच आत्मतत्त्व आहे असे जाणणे | विविध नामरूपात वेगवेगळे तत्त्व आहे असे जाणणे | फक्त एकातच पूर्ण आसक्ति असणे |
| **कर्म** | कर्तव्य समजून केलेले ममत्त्व रहीत फळाचा त्याग करून शोभनीय वा अशोभनीय असा विचार न करता केलेले नियतिने ठरवलेले कर्म | मी करतो असे मानून सकाम भावनेने फार कष्टाने केलेले कर्म देहक्लेश अपकीर्ति अपयशाच्या भयाने केलेले वा न केलेले | संदर्भरहीत क्रूर हिंसात्मक भावनेने मोहाने भ्रमाने अज्ञानाने हेकटपणाने केलेले वा अजिबात न केलेले कर्म |
| **कर्ता** | ममत्त्व रहीत कर्तेपणाचा त्याग करणारा उत्साही धीरयुक्त यश वा अपयशात सम भाव ठेवणारा | राग द्वेश व ममत्त्व युक्त फलाग्रही लोभी यश अपयशात हर्ष शोक करणारा हिंसा करणारा शौच अशौच न मानणारा | गावंढळ नाठाळ आळशी चेंगट दुःखी व अयोग्य रितीने काम करणारा |
| **बुद्धि** | काय करावे वा करू नये प्रवृत्ति निवृत्ति बंध मोक्ष जाणणारी | काय करावे वा करू नये प्रवृत्ति निवृत्ति बंध मोक्ष धर्म अधर्म न जाणणारी | अधर्म हाच धर्म मानणारी अत्यंत विपरीत विचार करणारी |

| | | | |
|---|---|---|---|
| **धृति** | मन प्राण व इंद्रियांना ताब्यात ठेवणारी योगाभ्यास करणारी धर्म अर्थ  काम मोक्ष योग्य प्रकारे सांभाळणारी | केवळ प्रसंगात फायदा असेल तर फळाच्या अपेक्षेने वागणारी | स्वप्नीलता भय शोक विषाद न सोडणारी |
| **सुख** | सुरवातीला कडू वाटणारे पण अंती श्रेय करणारे बुद्धिला व मनाला शांत व आनंदित करणारे | सुरवातीला गोड वाटणारे पण अंती कडु फळ देणारे विषय व इंद्रियांच्या संयोगाने उत्पन्न होणारे | सुरवातीला व शेवटीही बंधनात टाकणार मोह व अज्ञान उत्पन्न करणारे निद्रा आळस व प्रमादात वाटणारे |
| **आहार** | हलका शक्ति वाढवणरा ताजा रूचकर स्वादिष्ट | चमचमीत आंबट तिखट तेलकट तुपकट | शीळा नासका उष्टा थंडगार |

वरील तक्ता जर नीट अभ्यासला तर सात्विक मनोवृत्तीचे महत्व पटेल व सुखाकडे वाटचाल करण्यासाठी मनुष्य नक्कीच गजाननाची उपासना करील .

आणि हो अन्ना मूळे मन बनते असे शास्त्र सांगते याचा गांभिर्याने विचार व्हावा .

आता एवढेच ...

# अथर्वशीर्षम्

## शांतिपाठ

ॐ भद्रं कर्णेभिः श्रुणुयाम देवाः | भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः |
स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिः | व्यशेयं देवहितं यदायुः ||१||
ॐ स्वस्ति नः इंद्रो वृध्दश्रवाः | स्वस्ति न पूषा विश्ववेदाः |
स्वस्तिनस्ताक्ष्र्यो अरिष्टनेमिः | स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ||२||
|| ॐ शांतिः शांतिः शांतिः ||

## || अथर्वशीर्षम् ||

ॐ नमस्ते गणपतये | त्वमेव प्रत्यक्षन् तत्त्वमसि | त्वमेव केवलं कर्तासि | त्वमेव केवलं धर्तासि | त्वमेव केवलं हर्तासि | त्वमेव सर्वम खल्विदं ब्रम्हासि | त्वौ साक्षात आत्मासि नित्यम् || ऋतौ वच्मि | सत्यौ वच्मि ||
अव त्वं माम् | अव वक्तारम् | अव श्रोतारम् | अव दातारम् | अव धातारम् | अवानूचानमवशिष्यम् | अव पश्चात्तात् | अव पुरस्तात् | अवोत्तरात्तात् | अव दक्षिणात्तात् | अव चोर्ध्वात्तात् | अवाधरात्तात् | सर्वतो मां पाहि पाहि समन्तात् ||

त्वौ वाङ्मयस्त्वै चिन्मयः | त्वमानन्दमयस्त्वं ब्रह्ममयः | त्वौ सच्चिदानन्दाद्वितीयोऽसि त्वं प्रत्यक्षं ब्रह्माासि | त्वै ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि || सर्वम् जगदिदन् त्वत्तो जायते सर्वम् जगदिदन् त्वत्तस्तिष्ठति | सर्वम् जगदिदन् त्वयि लयमेष्यति | सर्वम् जगदिदं त्वयि प्रत्येति |

त्वं भूमिरापोऽनलोऽनिलो नभः| त्वं चत्वारि वाक्पदानि || त्वं गुणत्रयातीतः| त्वं देहत्रयातीतः | त्वं कालत्रयातीतः | त्वं मूलाधारस्थितोऽसि नित्यम् |
त्वौ शक्तित्रयात्मकः | त्वां योगिनो ध्यायन्ति नित्यम् |

त्वं ब्रह्मा त्वौविष्णुस्त्वण्रूद्रस्त्वमिन्द्रस्त्वमग्निस्त्वौवायुस्त्वौसूर्य त्वञैचन्द्रमास्त्वं ब्रह्मभूर्भुवः स्वरोम् || गणादिं पूर्वमुच्चार्य वर्णादिस्तदनन्तरम् | अनुस्वारः परतरः| अर्न्धेन्दुलसितम् | तारेण ऋद्धम् | एतत्तव मनुस्वरूपम् | गकारः पूर्वरूपम् | अकारो मध्यमरूपम् | अनुस्वारः श्चान्त्यरूपम् | बिन्दुरूत्तररूपम् |
नादः सन्धानम् | सौहिता सन्धिः| सैषा गणेश विद्या | गणक ऋषिः| निचृद्गायत्री छन्दः | गणपतिर्देवता | ॐ गं गणपतये नमः ||
एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डायधीमहि तन्नो दन्ती प्रचोदयात् ||

एकदन्तञै चतुर्हस्तं पाशमङ्कुशधारिणम् रदञै च वरदौ हस्तैर्बिभ्राणम् मूषकध्वजम् रक्तं लम्बोदरौ शूर्पकर्णकं रक्तवाससौ रक्तगन्धानुलिप्ताङ्गौ रक्तपुष्पै सुपूजितम् भक्तानुकम्पिनं देवौ जगत्कारणमच्युतम् आविर्भूतञै च सृष्टयादौ पुरूषात् परम् | एवं ध्यायति यो नित्यौ स योगी योगिनां वरः ||

नमो व्रातपतये नमो गणपतये नमः प्रमथपतये नमस्तेऽअस्तु लम्बोदरायैकदन्ताय विघ्ननाशिने शिवसुताय वरदमूर्तये नमः ||

|| ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ||

श्री गणेशाय नमः

# शांतिपाठ

ॐ भद्रं कर्णेभिः श्रुणुयाम देवाः | भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः |
स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिः | व्यशेयं देवहितं यदायुः ||१||
ॐ स्वस्ति नः इंद्रो वृध्दश्रवाः | स्वस्ति न पूषा विश्ववेदाः |
स्वस्तिनस्ताक्ष्र्यो अरिष्टनेमिः | स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ||२||
|| ॐ शांतिः शांतिः शांतिः ||

**भावार्थ ः**

हे देवांनो आमच्या कानांना शुभ वार्ताच ऐकू यावी. आमच्या डोळयांना शुभाचेच दर्शन व्हावे. जे काही प्राप्त आयुष्य आहे ते सुदृढ अवयवांनी व शरीराने युक्त असावे व ते ईशस्तुति करत व्यतीत व्हावे.

ज्ञानवृद्ध ऋषींकडून ज्याची कीर्ति ऐकिवात आहे असा इंद्र आमचे कल्याण करो. सर्वांचे भरण पोषण करणारा व सर्वज्ञ असा सूर्य आमचे मंगल करो. प्रचंड झेपेत सर्व संकटांचा नाश करणारा गरूड आमचे शुभ करो. देव गुरू बृहस्पतिचा आमच्यावर वरदहस्त असो.

अधिभौतिक अधिदैविक व अध्यात्मिक असे आमचे तीन प्रकारचे ताप नष्ट होवोत.

**विवेचन ः**

ईश्वराची प्रार्थना करून व त्याच्या कडून शुभाची मागणी करून कोणत्याही उपक्रमाला सुरवात केली जाते जेणेकरून उपक्रम निर्विघ्न पार पडावा ही इच्छा.

# श्री गणपत्यथर्वशीर्षम् प्रारंभ

## ॐ नमस्ते गणपतये

**भावार्थ ः**

ॐ ! हे गणपते तुला माझा नमस्कार असो .

**विवेचन ः**

वैदिक परंपरे प्रमाणे प्रथम ओम् चा उच्चार करण्याची प्रथा आहे . आपल्या जीभेने सुरवातीला शुभ शब्द म्हणावा हाच त्या मागचा हेतू . ओम् हे ईश्वराचे केवळ प्रतिक नसून ते ईश्वर रूप आहे . वैदिक काळा नंतर ओम् ची जागा हरी हरी राम राम कृष्ण कृष्ण इत्यादींनी घेतली एवढेच .

सांप्रत काळात आपण आदरणीय व्यक्तिंना संबोधताना दादा साहेब काका किंवा मामा असे म्हाणतो . तसेच गणेशाला ओम् असे संबोधले आहे . साक्षात ब्रह्म स्वरूप गणपतीला ब्रह्माचे प्रतिक असलेल्या ओम् ने हाक मारणे हे औचित्यपूर्ण आहे .

आता आपण पुढच्या मंत्रा कडे वळायच्या आधी गणपतीचा अर्थ पाहू .

गणपति ह्या शब्दाची फोड अशी की

गणपति = गणांचा पति  षष्टी तत्पुरूष समास .

संस्कृत मधे गण् ह्या धातूचा अर्थ गणना करणे मोजणे वर्गीकरण करणे असा आहे . मोजदाद केवळ नामरूपात्मक सापेक्ष पदार्थ जगताची करता येते . म्हणून गण् याचा अर्थ मोजदाद करता येण्याजोगे जगत असा घ्यावा व ह्या जगाचा पति म्हणजे जगाला सांभाळणारा त्याचे नियंत्रण करणारा तो गणपति . तो स्वतः अ गण्य आहे हे ध्यानात घेऊन त्या निर्गुण गजाननाची सगुण उपासना करावी हा मतितार्थ .

## त्वमेव प्रत्यक्षन् तत्त्वमसि

**भावार्थ ः**

तू वास्तविक केवळ तत्त्व आहेस.

**विवेचन ः**

अथर्वशीर्ष हे केवळ स्तोत्र नसून ते एक उपनिषद आहे. उपनिषदाचा विषय सत्य तत्त्वाचे दिगदर्शन करणे आणि ब्रह्म जीव जगत एकच आहेत हे सिद्ध करणे हा आहे. आता तत्त्वमसि चा अर्थ बघू. तत्त्वमसि 'तत् त्वम् असि' म्हणजे ते तूच आहेस. ते या पदात सर्व गोचर जगाचा समावेश होतो. ऋषि सांगतात गजानना तूच या सर्व जगात समाविष्ट आहेस. सर्व जगत आणि त्यातील सर्व जीवभाव ही तुझी व्यक्त रूपे आहेत. तेव्हा आपण जीवभाव नसून गजानन स्वरूप आहोत ही धारणा करून गणेशाची सगुण उपासना करायची आहे.

गजाननाचे वर्णन ऋषि पुढे चालू ठेवतात.

## त्वमेव केवलं कर्तासि त्वमेव केवलं धर्तासि
## त्वमेव केवलं हर्तासि त्वमेव सर्वम् खल्विदं ब्रम्हासि
## त्वं साक्षात आत्मासि नित्यम्

**भावार्थ ः**

तूच केवळ कर्ता आहेस धारण करणारा व हरण करणारा आहेस. तूच केवळ बृहद् तत्त्व आहेस. तू साक्षात अविनाशी असे नित्य तत्त्व आहेस.

**विवेचन ः**

कर्ता धाता हरता याचा अर्थ दोन स्थरावर घेता येतो. गजानन तत्त्वा पासून हे सर्व जगत बनले आहे व ते त्याच्यावर प्रतित होते आणि कालांतराने त्याच्यातच पुनः विलीन होते. ह्या अर्थी गजानन कर्ता धाता हरता आहे. दुसरे असे की ह्या

जगतात ज्या ज्या घटना घडामोडी कर्मे होतात ती सर्व गजाननाच्या इच्छेने व त्याच्याच बळावर होतात. ह्या अर्थाने देखील गजानन कर्ता धाता हरता आहे.

आता कर्ता धर्ता तूच आहेस असे ऐकल्यावर असा समज होऊ शकतो की गजानन हा कोणी एक मनमानी करणारा जुलमी सुलतान असावा व तो कुठेतरी आसमंतात गुप्तपणे वास करत असावा आणि स्वतःच्या मर्जी प्रमाणे सर्व सुत्रे हलवत असावा. तसे नाही आहे. ह्याचा खुलासा करण्या साठी ऋषि म्हणतात ...

## त्वम् एव खलु इदम् ब्रह्म असि त्वम् साक्षात नित्यम् आत्मा असि

**भावार्थ ः**

हे जे काही जगत आहे ते तूच आहेस. तू नित्य शाश्वत ब्रह्म तत्त्व आहेस.

**विवेचन ः**

जगत उत्पत्तिच्या संदर्भात अनेक मते आहेत. पण वेदांताचा सिध्दांत आपण पाहू. कोणत्याही निर्मितीस तीन कारणे किंवा घटक लागतात.

- उपादान कारण Material Cause
- निमित्य कारण Efficiant Cause
- साधन कारण Instrumental Cause

घट पट आणि जगत निर्मितीस काय लागते ते खालील तक्त्या वरून स्पष्ट होईल.

| **कारण** | **घट** | **पट** | **जगत** |
|---|---|---|---|
| उपादान कारण Material Cause | माती | कापूस दोरा | गजानन तत्त्व |
| निमित्य कारण Efficiant Cause | कुंभार | विणकर | गजानन तत्त्व |
| साधन कारण Instrumental Cause | चाक | माघ | गजानन तत्त्व |

लक्षात घ्या की घट किंवा पटाच्या निर्मितीत निमित्य कारण हे निर्मित वस्तुहून भिन्न असते. जसे कुंभार व विणकर हे अनुक्रमे घट व पटाहून भिन्न आहेत. तसेच साधन कारण हे घटा पटा पासून वेगळे रहाते. पण जग निर्मितीत केवळ गजानन एकटाच उपादान निमित्य आणि साधन आहे. गजानन स्वतःच्या इच्छेने स्वतः मधून स्वतःवर ह्या जगताचा भास उत्पन्न करतो. ही लीला आहे.

वेदांत म्हणतो की खांबावर दिसणारे भूत ही खांबाची निर्मिति आहे. खांबावरच ते प्रतित होते व खांबातच विलीन होते. ते भ्रामक असते. केवळ भासते एवढेच. त्याच प्रमाणे जगत हे गजानन तत्त्वावर केवळ भासमान आहे. सर्वत्र केवळ गजानन तत्त्व आहे. दूसरे काही नाही. जीव जगत व गजानन केवळ एकच गजानन तत्त्व आहे.

शेवटी ऋषि परम् सिद्धांत मांडतात की जीवा तू ब्रह्म स्वरूप गजानन तत्त्व आहेस. अशा रीतीने जीव ब्रह्म ऐक्य प्रस्थापित केले गेले.

## ऋतम् वच्मि  सत्यम् वच्मि

**भावार्थ ः**
मी यथार्थ बोलत आहे. सत्य बोलत आहे.

**विवेचन ः**
आता पर्यंत ऋषिंनी बरेच गूढ व उच्च्य वैज्ञानिक सिद्धांत सांगितले. त्याच्या लक्षात आले की ऐकणारे साधक शंका घेतील की ह्या ऋषिंना कशावरून हे सर्व माहीत असेल. म्हणून ऋषि म्हणतात अहम् ऋतम् वच्मि  अहम् सत्यम् वच्मि. खर तर ऋत आणि सत्य सांगणे यांचा व्यावहारीक अर्थ आहे खरे बोलणे. ही तर द्विरूक्ती झाली. पण ऋषिंकडून अशी द्विरूक्तीची चूक नकळतही होणार नाही. मग ऋत व सत्य या दोघांचा अर्थ भिन्न असावा.

संस्कृत भाषा अर्थगर्भ आहे. संस्कृत मधे ऋत व सत्य यांचे अर्थ वेगवेगळे आहेत.

ऋत् १ गण परस्मैपदी अर्थ जाणारे बदलणारे दया करणे स्पर्धा करणे.

सत्य म्हणजे जे कालत्रयी बदलत नाही. त्रिकालाबाधित सत्य.

ऋषि म्हणतात आम्ही तुम्हाला सत्य सांगतोय म्हणजे असे सिध्दांत सांगतो की जे कधिही बदलणार नाहीत. ते सदा सर्वदा खरेच राहातील. पण यापुढे आम्ही काही अशी काही माहीती सांगू की ती आज खरी असेल पण कालमानाप्रमाणे त्यात काही बदल होऊ शकतील. उदाहरणार्थ गजानन हे सत्य तत्त्व असून निर्गुण निराकार आहे हे झाले सत्य सांगणे जे कधीही बदलणार नाही. पण उपाासना कशी करावी अनुष्टान कसे करावे ह्या बाबतची माहीती ही कालमाना प्रमाणे बदलू शकते. हे झाले ऋत बोलणे.

## अव त्वं माम् अव वक्तारम् अव श्रोतारम्
## अव धातारम् अवानुचाम् अव शिष्यम्

**विवेचन ः**

वरील पाच व पुढील सात मंत्रांमधे ऋषिंनी सर्वतोपरी सर्वांचे रक्षण कर अशी व्यावहारीक प्रार्थना केली आहे. पण एवढे प्रज्ञावान ऋषि हे बारा मंत्र केवळ व्यावहारीक संरक्षणाची मागणी करण्यासाठी खर्च करतील अस वाटत नाही.

अव् ह्या धातुचे बरेच अर्थ आहेत. ते असे. रक्षण करणे सुख देणे जाणणे आवडणे इच्छिणे.

ऋषि म्हणतात हे गजानना

- तू आमचे सर्वांचे सर्वतोपरी रक्षण कर
- तुझ्या स्वरूपाची आम्हाला जाणीव करव
- तू आम्हाला सदैव सुखात ठेव
- तू आम्हाला आवडशील असे कर जेणे करून तुझी भक्ति प्राप्त होईल
- केवळ तुझे रूप पाहायची आम्हाला इच्छा असावी

ही अशी इच्छा होणे व त्यासाठी प्रार्थना करणे ही मुमुक्षत्वाची पहिली पायरी आहे.

ऋषिंना आता गुरू प्राप्त झाला आहे. ते म्हणतात गजानना तू आमच्या गुरूंचे रक्षण कर जे येथे वक्ते आहेत. त्यांच्या कडून आम्हाला ज्ञान मिळो. आम्ही सर्व साधक श्रोते आहोत. आमचेही रक्षण कर. हे ज्ञान संग्रहीत करणाऱ्या सर्व सेवकांचे व यंत्रणेचे रक्षण कर. सतत एका जागी ज्ञान गोळा करून त्याचा संग्रह करणारे शिष्य यांचेही रक्षण कर.

आता आपण वक्ता श्रोता धारण करणारा व संग्रह करणारे शिष्य यांचा एकत्रितपणे विचार करूया. ही एक ज्ञानपिठाची किंवा महाविद्यापिठाची संकल्पना आहे. आजकाल विद्यापिठे असतात तर त्या काळी गुरूकूले होती. केवळ गुरू शिष्याची जोडी ज्ञान देण्याघेण्याचे काम करू शकत नाही. त्यासाठी इतर पूरक अशा अनेक माणसांची व यंत्रणेची गरज असते. त्या अशा ...

- विद्यापिठाची वास्तु
- कुलगुरू व विद्यापीठ चालवणारी यंत्रणा
- ज्ञान प्रदान करणारे उप गुरू.
- संग्रहालय व ती चालवणारी यंत्रणा
- धन देणारे दाता
- सर्व शिष्य परिवार

ह्या सर्वाच्या सहकार्याने ज्ञानदान संभवते. आता ह्या सर्वाचा पुराणकाळ व आधुनिक काळ याच्या संदर्भात तौलनिक अभ्यास करू.

| **घटक** | **वैदिक अथवा पौराणिक काळ** | **आधुनिक काळ** |
|---|---|---|
| पीठ | गुरूकूल | विद्यापिठ |
| वक्ता | कुलगुरू | कुलगुरू प्रमुख प्राद्यापक |
| श्रोता | शिष्य | शिष्य |
| दाता | राजा धनिक | धनिक सरकार दानशूर प्रजा वा संस्था |
| धाता | उपगुरू ग्रंथ ग्रंथालय | लेक्चरर ग्रंथ ग्रंथालय |
| संग्राहक | लेखक ऋषि | संग्राहक यंत्रणा Documentors |
| शिष्य | साधक सहाय्यक | विद्यार्थी सहाय्यक |

ऋषिंनी व्यापक अर्थाने गजाननाकडे प्रार्थना केली आहे. वरील सर्व घटक ईश्वराकडून प्रेरीत व अनुशासित असावेत. त्यांच्यावर ईश्वराची कृपा असावी जेणे करून हे ज्ञानदानाचे कार्य सुरळीत होईल.

**अव पश्चात्तात् अव पुरस्तात् अवोत्तरात्तात् अव दक्षिणात्तात्**
**अव चोर्ध्वात्तात् अवाधरात्तात् सर्वतो मां पाहि पाहि समन्तात्**

**भावार्थ ः**
माझे पाठीमागून म्हणजे पश्चिमे कडून पुढून म्हणजे पूर्वेकडून उत्तरे कडून दक्षिणे कडून उर्ध्व दिशे कडून आणि पाताळ दिशे कडून सरक्षण कर . तू माझे सर्व कडून संरक्षण कर .

**विवेचन ः**
संकटे तीन प्रकारची असतात .

- अधिभौतिक ः शारिरीक आजार वगैरे
- अधिदैविक ः भूकंप अवकाळ अती वर्षा वीज पडणे टोळ धाड इत्यादि
- अध्यात्मिक ः अभ्यासात मन न लागणे लक्षात न राहाणे साधना अर्धवट राहाणे इत्यादि

ह्या सर्व संकटांपासून तू आमचे निवारण कर जेणे करून आमची साधना सुरळीत होईल .

**त्वम् वाङ्मय त्वम् चिन्मयः त्वम् आनन्दमयः**
**त्वम् ब्रह्ममयः त्वम् सच्चिदानन्दः अद्वितीयः असि**
**त्वम् प्रत्यक्षं ब्रह्माासि त्वम् ज्ञानमयो विज्ञानमयः असि**

**भावार्थ ः**
तू वाचा स्वरूप आहेस . तू चैतन्यमय आहेस . तू आनंदमय आहेस . तू ब्रह्ममय आहेस . तू सत् चित् आनंदमय असा आहेस . तू अद्वितीय आहेस .

**विवेचन ः**

आता गजानन तत्त्वाचे विवेचन पुढे चालू ठेवतात. हे तत्त्व वाचा स्वरूप आहे. वाक् ह्या धातु पासून वाचा हे नाम होते. त्याचा अर्थ आहे वाणी शब्द किंवा सरस्वती. गजानन तत्त्वाचे पहिले सगुण रूप आहे शब्द ध्वनी. ओंकार हा मूळ ध्वनी आहे. ओंकार हे गजाननाचे सगुण स्वरूप आहे.

हे तत्त्व जड नाही आहे. ते चेतनामय आहे. ते दुःखी नाही आहे तर आनंदमय आहे. खर तर ते निर्गुण निराकार असे आहे. पण ते आहे का ते अचेतन आहे का ते दुःखमय आहे का अशा शंकांचे निराकरण करण्यासाठी ऋषि सांगतात की गजानन तत्त्व सत् म्हणजे अस्तित्व आहे. चेतनामय व आनंदमय़ आहे. वास्तविक ते तसेही नाही. त्याच्यात कोणतेही गुणधर्म नाहीत. ते केवळ आहे. अद्वितीय असे आहे. त्याच्या सारखे दूसरे काही नाही. केवळ तेच ते आहे.
लक्षात घ्यावे की हे समजण्यासाठी केवळ गुरूकृपा हवी.

ऋषि  शेवटी सांगतात गजानना तू वास्तविक ब्रह्म तत्त्व आहेस. केवळ हेच तुझे वर्णन यथार्थ आहे. तू केवळ ज्ञान आहेस. तू विज्ञान म्हणजे विश्व देखील आहेस.

खर तर तू केवळ अस्तित्त्व आहेस. You are the Menon not Phenomenon. You are the Existance.

## सर्वम् जगदिदन् त्वत्तो जायते  सर्वम् जगदिदन् त्वत्तस्तिष्ठति
## सर्वम् जगदिदन् त्वयि लयमेष्यति सर्वम् जगदिदं त्वयि प्रत्येति

**भावार्थ ः**

सर्व जग तूझ्यापासून उत्पन्न होते. तुझ्या मधे स्थित आहे व तुझ्यातच लय पावते. ते तुझ्यावर भासमान आहे.

**विवेचन ः**

वेदांताचा सृष्टी उत्पत्तीचा सिद्धांत आपण पुर्वीच पाहीला आहे. खांबावर भूत जसे केवळ भासमान असते तसेच जग हे गजानन तत्त्वावर भासते. ते गजाननाच्या अधिष्टानावर स्थित आहे. ते शेवटी त्याच्यातच विलीन होते.

परम् तत्त्वा पासून प्रथम सत्य संकल्प तयार झाला. एकोऽहम् बहु स्याम् म्हणजे सत्यतत्त्वाला वाटले आपण एकटे आहोत अनेक होऊया. हा सत्य संकाल्प. त्यापासून शिव तत्त्व होते. यालाच महद् असेही म्हणतात. शिवा पासून शिवसुत (Exention of Shiv) गजानन तत्त्व ओंकार स्वरूपात होते. ओंकार हे ब्रह्मन् चे पहीले सगुन किंवा प्रगट रूप आहे. त्यानंतर ओंकारा पासून नामरूपात्मक जगाची उत्पत्ति होते.

## त्वम् भूमि आपः अनलः अनिलः नभः
## तम् चत्वारी वाक् पदानि

**भावार्थ ः**

तू पृथ्वी जल अग्नि वायु अवकाश आहेस. तू वाचेची चार रूपे आहेस.


**विवेचन ः**

ओंकारापासून अनुक्रमे अवकाश वायु अग्नि जल पृथ्वी तत्त्वे निर्माण झाली. ह्या पाच मूळतत्त्वांच्या पंचीकरण पद्धतिने स्थूल पृथ्वी जल अग्नि वायु अवकाश तत्त्वे झाली. नंतर ह्या स्थूल पृथ्वी जल अग्नि वायु व अवकाशाच्या मिश्रणाने (Permutaion and Combination) वस्तू जगताची जडणघडण होते.

शेवटी हे जग उलटया क्रमाने म्हणजे पृथ्वी जल अग्नि वायु अवकाश ओंकार शिव तत्त्व सत्य संकल्प ह्या अनुक्रमे परब्रह्मात विलीन होते. याला महालय म्हणतात.

आता परम् तत्त्वा पासून पंचीकरण पद्धतिने जग क्रमशः कसे निर्माण होते हे तक्त्यांच्या सहाय्याने पुनः नीट समजाऊन घेऊ .

## पंचमहाभूतांची उत्पत्ति




वरील सर्व महाभूते त्यांच्या सूक्ष स्वरूपात प्रथम प्रगट होतात . प्रत्येकाला सत्व रज तम अशा तीन तन्मात्रा असततात . नंतर त्यांचे पंचीकरण होऊन स्थूल महाभूते तयार होतात .

## सूक्ष्म महाभूतांच्या तम मात्रेचे पंचीकरण व त्यांची उत्क्रांति

| सूक्ष्म महाभूतांच्या तम मात्रेचे पंचीकरण | उत्क्रांति |
|---|---|
| 1/2पृथ्वी + 1/8आप + 1/8तेज + 1/8वायु + 1/8आकाश | स्थूल पृथ्वी |
| 1/2आप + 1/8तेज + 1/8वायु + 1/8आकाश + 1/8पृथ्वी | स्थूल आप |
| 1/2तेज + 1/8वायु + 1/8आकाश + 1/8पृथ्वी + 1/8आप | स्थूल तेज |
| 1/2वायु + 1/8आकाश + 1/8पृथ्वी + 1/8आप + 1/8तेज | स्थूल वायु |
| 1/2आकाश + 1/8पृथ्वी + 1/8आप + 1/8तेज + 1/8वायु | स्थूल आकाश |

वरील स्थूल तम मात्रांच्या महाभूताच्या मिश्रणाने (Permutaion and Combination) वस्तू जगताच्या स्थूल सांगाडयाची (Raw Skeleton) जडणघडण होते .

## मूलभूत सत्व व रज पंचमहाभूतांची उत्क्रांति

| महाभूत | सत्व तन्मात्रा | रज तन्मात्रा |
|---|---|---|
| आकाश | कर्णेंद्रिये | वाक् |
| वायु | स्पर्शेंद्रिये | हात |
| अग्नि | नेत्रेंद्रिये | पाय |
| जल | रसनेंद्रिये | जननेंद्रिय |
| पृथ्वी | गंधेंद्रिये | गुद |

## त्रिगुणाच्या सत्व  तम व रज ह्या तिन्ही गुणाची एकत्रित उत्क्रांति

| **तन्मात्रा** | **समष्टि स्थर** | **व्यष्टि स्थर** |
|---|---|---|
| सर्व सत्व | हिरण्य गर्भ | अंतःकरण |
| सर्व रज | मुख्य प्राण | पंचप्राण |
| सर्व तम | स्थूल महाभूते | देह |

वरील तक्त्याचा नीट अभ्यास केला तर लक्षांत येते की स्थूल शरीर हा जड पदार्थ तर आहेच पण अंतःकरणही स्थूल व जड आहे. ते केवळ पंचमहाभूतांच्या सत्व तन्मात्रे पासून बनले आहे एवढेच.

आता ऋषि सांगतात की  तम् चत्वारी वाक् पदानि म्हाणजे तू वाचेची चार रूपे आहेस. याचा शास्त्रीय भाषेत विचार करू.

वाक् याचा अर्थ केवळ वाणी नव्हे. शास्त्रीय भाषेत वाक् म्हणजे नाद किंवा कंपनाने निर्माण होणाऱ्या लहरी. काही लहरी मानवाच्या कानांना केवळ ऐकू येतात. तर काही केवळ दिसतात ऐकू येत नाहीत. तर काहींचा केवळ स्पर्श कळतो. तर इतर लहरींचे मानवाला ज्ञान होत नाही.

- श्रवणीय लहरी (Audiable)
- दर्शनीय लहरी (Video)
- स्पर्शनीय लहरी (Touchable)
- जाणीवेच्या पलीकडच्या लहरी (Very High & very low Frequency waves)

ऋषि ह्या लहरींचे वर्गीकरण खालील प्रमाणे करतात ...

- वैखरी  म्हणजे जीभेने उच्चारला जाणारा ध्वनी
- मध्यमा  म्हणजे अस्पुट स्वरांत उच्चारला जाणारा ध्वनी
- पश्यंती  म्हणजे जीभ न हलवता उच्चारला जाणारा ध्वनी
- परा  म्हणजे अंतर्यामी होणारा पण बाहेर ऐकू न येणारा ध्वनी

वर्गीकरण कसेही करा पण ऋषि सांगतात की ओंकार हा कंपन स्वरूप आहे. व ही कंपने स्थूलमानाने चार प्रकारची असतात. सगुण ओंकार गुणमयी आहे. म्हणून तो पदार्थ (Matter) आहे. हा एक अभ्यास करण्याचा प्रकार आहे. तज्ञांनी त्यावर जरूर सखोल अभ्यास करावा.

पदार्थाला भौतिक गुणधर्म असतात.

पदार्थाचे (Matter)  भौतिक गुणधर्म

- सअवकाशता ः पदार्थ अवकाश किंवा जागा (Space) व्यापतो
- वस्तुमान असणे ः पदार्थाला वस्तुमान (Mass) म्हणजे वजन असते
- काळाने बध्द असणे ः पदार्थ काळाने (Time bound) नियंत्रित असतो
- शक्तिमय ः पदार्थाला प्रगट किंवा अप्रगट उर्जा (Energy) असते
- प्राकाश्य ः पदार्थ दृश्यमान गोचर किंवा अदृश्य अगोचर असतो
- प्रवाही किंवा स्पंदनशील ः पदार्थात वहाण्याची क्षमता असते किंवा तो स्पंदनशील असतो (Fluid or Vibratory)

ओंकार व ओंकारा पासूनचे सर्व जगत गुणमयी आहे हे जाणावे. पण परम् तत्त्व हे निर्गुण आहे याचे भान असावे.

लक्षांत घ्यावे की हा एक भौतिक शास्त्राच्या भाषेत परम् तत्त्व समजून घेण्याचा अल्प प्रयत्न आहे. जे वेद आणि थोर ऋषिमूनींना उमजले नाही ते शास्त्राला कसे कळणार. पण केवळ श्रद्धा वाढावी म्हणून केलेला हा अल्प प्रयत्न.

## त्वं गुणत्रयातीतः त्व अवस्थात्रयातीतः त्वं देहत्रयातीतः त्वं कालत्रयातीतः त्वं मूलाधारस्थितोऽसि नित्यम् त्वं शक्तित्रयात्मकः त्वां योगिनो ध्यायन्ति नित्यम्

**भावार्थ ः**

तू तिन्ही गुणांच्या पलीकडचा आहेस. तू तिन्ही अवस्थांच्या पलीकडचा आहेस. तू तिन्ही देहांच्या पलीकडचा आहेस. तू तिन्ही काळांच्या पलीकडचा आहेस. तू मूलाधार चक्रात स्थित आहेस. तू तीन प्रकारच्या शक्तिंनी युक्त आहेस. अशा भावनेने योगी तुझे ध्यान करतात.

**विवेचन ः**

गजानन तत्त्व हे गुणातीत आहे याचा उहापोह आपण पूर्वीच केला आहे व समजून घेतले आहे की गजानन ही वस्तु नसून केवळ तत्त्व आहे.
आता सांगतात की गजानन हा तिन्ही अवस्थांच्या पलीकडचा आहे. जगात तीन अवस्था अशा असतात ...

- जागृतावस्था
- स्वप्नावस्था
- सुषुप्ति अवस्था

ह्या अवस्था केवळ सापेक्ष वस्तु जगाला लागू होतात. निरपेक्ष तत्त्वाला नसतात

जगात तीन प्रकारचे देह किंवा शरीरे संभवतात. ती अशी ...

- स्थूल शरीर ः जो हाडामसाचा व रूधीर वगैरेचा बनला आहे
- सूक्ष्म शरीर ः अंतःकरण हा सूक्ष देह आहे
- कारण शरीर ः पूर्व जन्मोजन्मीच्या वासना हे कारण शरीर आहे त्यामूळे आपल्याला हा जन्म प्राप्त झाला

पण गजानन तत्त्व हे जगत वस्तु नाही त्यामूळे त्याला शरीर नाही.

काळ हा केवळ सापेक्ष जगात असतो. भौतिक शास्त्रानुसार काळ म्हणजे दोन घटनातील अंतर. Time is the distance between two events.
तीन काळ असे ...

- वर्तमानकाळ
- भूतकाळ
- भविष्यकाळ

गजानन निरपेक्ष तत्त्व असल्याने तेथे घटना घडत नाहीत म्हणून काळ संभवत नाही.

गजानन हा तीन शक्तिंनी युक्त असतो. त्या अशा ...

- इच्छा शक्ति
- ज्ञान शक्ति
- क्रिया शक्ति

शक्ति किंवा बळ सापेक्ष वस्तु जगात संभवते. गुरूत्वाकर्षण दोन अणूतील आकर्षण विद्युतचुंबकीय बळ इत्यादि सर्व शक्ति परम् तत्वाचा प्रभाव आहे.

आता ऋषि सांगतात की गजाननाचा वास मूलाधार चक्रात असतो. तो सर्व विश्वाचा आधार आहे. मूलाधार चक्र व इतर चक्रे व त्या संबंधीचा यौगिक अभ्यास हा मोठा गहन विषय आहे. तो जाणण्यासाठी केवळ सद्गुरू मदत करू शकताात. सर्व योगी गजाननाचे ध्यान मूलाधार चक्रावर करतात.

## त्वं ब्रह्मा त्वं विष्णु त्वं रूद्र त्वं इन्दं त्वं अग्नि त्वं वायुः
## त्वं सूर्य त्वं चन्द्रमा त्वं ब्रह्म भूः भवः स्वरोम्

**भावार्थ ः**

तू ब्रह्माजी विष्णु शिवजी इंद्र अग्नि वायु सूर्य चंद्र ब्रह्म पृथ्वी लोक अंतरीक्ष लोक व स्वर्गलोक आहेस.

**विवेचन ः**

गजानन सर्वत्र आहे हे ठीक आहे. पण त्याचे दर्शन मला कसे होईल हा विचार साधकाच्या मनांत येईल हे जाणून ऋषि गजाननाला समष्टी मधे कुठे बघावे हे सांगतात. ब्रह्माजी विष्णु शिवजी इंद्र अग्नि वायु सूर्य चंद्र ब्रह्म पृथ्वी लोक अंतरीक्ष लोक व स्वर्गलोक ह्या सर्व गजाननाच्या विभूत्या आहेत. एकात अनेकत्व बघु नये. पण अनेकत्वात ईश्वरीय एकत्व बघणे ही खरी साधना आहे.

## गणादिं पूर्वमुच्चार्य वर्णादिस्तदनन्तरम् अनुस्वारः परतरः
## अर्न्धेन्दु लसितम् तारेण ऋद्धम् एतत्तव मनुस्वरूपम्

**भावार्थ ः**

गण ह्या शब्दाच आरंभीचा शब्द ग् हा प्रथम उच्चारावा. मग त्यात अ मिसळून अनुस्वार द्यावा. मग त्यावर सुंदर असा अर्धचंद्र द्यावा. हे तूझे सगुण रूप आहे.

**विवेचन ः**

भावार्थातच स्पष्ट झाले आहे की गजाननाचे सगुण अक्षर रूप कसे तयार होते.

**ग् + अ +** ◆ **+** ˘ **= गँ** हे अक्षर रूप तयार झाले.

गँ ला बीज मंत्र असेही म्हणतात. याचा उपयोग जपासाठी करतात.

## गकारः पूर्वरूपम् अकारः मध्यमरूपम् अनुस्वारः च अन्त्य रूपम्
## बिन्दु उत्तररूपम् नादः सन्धानम् संहिता सन्धिः सैषा गणेश विद्या
## गणक ऋषिः निचृद्गायत्री छन्दः गणपतिर्देवता

**भावार्थ ः**

ग् हे सुरवातीचे रूप आहे. अकार मधले रूप आहे. अनुस्वार हे शेवटचे रूप आहे. तर बिंदु नंतरचे रूप आहे. ध्वनि हे त्याचे अनुसंधान आहे. अथर्वशीर्श ही संहीता हे स्त्रोत्र गजाननाची आराधना करण्यासाठी व प्राप्तिसाठी आहे. ही गणेश विद्या होय. ह्याचा कर्ता ऋषि गणक हा आहे. मंत्राचा छंद निचृत गायत्री हा आहे. मंत्राची देवता गणपति ही आहे.

**विवेचन ः**

गं हा बीज शब्द कसा झाला याचे स्पष्टिकरण आम्ही मागच्या मंत्रात दिले. हा ओंकारच आहे. ग् ही विश्व निर्मितीची सुरवात आहे. अ हा विस्ताार आहे. चंद्र हे त्याचे सुंदर असे पूर्णत्व आहे. तर बिंदु हा विश्वाचा लय आहे.


लक्षात घ्यावे की ह्या सर्व ज्ञान दानाचे व अथर्वशीर्श रचण्याचे कर्तृत्व ऋषि स्वतःकडे न घेता गणक ऋषि म्हणजे गणपतीची उपासना करणाऱ्या कोण्या एका गणक नावाच्या ऋषि कडे देतात व आपण गुप्त रहातात. हा मोठा विनय आहे.

ब्रह्म तत्त्वाचे प्रतिक म्हणून ऋषिंना ॐ कसा सुचला असावा त्यांनी ध्यानावस्थेत काय बघितले असावे ह्या मागे विज्ञान आहे. विश्व निर्मिति बाबत आधुनिक विज्ञान काय म्हणते. विश्व कसे निर्माण झाले असावे व त्याचा विस्तार कसा झाला असावा ह्याचा मागोवा आता आपण विज्ञानाच्या भाषेत घेण्याचा प्रयत्न करूया. त्याच बरोवर वेदांताची भाषा देखील विचारात घेऊ.

# ओंकार व गणपतिचे प्रतिकात्मक रूप कसे साकारते - वैज्ञानिक दृष्टिकोन

विश्व निर्मितिच्या आधी काहीच दृश्य स्वरूप नव्हते. केवळ निरपेक्ष (Absolute) निर्गुण निराकार असे तत्त्व होते. मग एक आभू म्हणजे सूक्ष्म असा गोळा झाला. त्यांत विश्वाचे सर्व वस्तुमान (Mass) व उर्जा (Energy) एकवटली होती. आभूचे तापमान वाढू लागले. मग एक महास्फोट झाला. त्या आभुतून वस्तुमान व उर्जा प्रचंड वेगाने बाहेर फेकली जाऊ लागली. त्यातून हे विविधतेचे जग निर्माण झाले.

**आकृति क.१**





मकार शिवतत्त्व

प्रथम निराकार मूळ तत्त्व होते. (आकृति क.१) त्यातून वस्तुमान (Mass) व उर्जा बाहेर फेकली जाऊ लागली व चंद्रकोरी सारखा आकार तयार झाला. चंद्रकोर हा अर्धकंस व मूळ आभू मिळून वरील आकृतीत दाखवल्या प्रमाणे मकार म्हणजे शिवतत्त्व तयार झाले.

शिवसूत म्हणजे गजानन किंवा ओंकार होय. सूत याचा अर्थ मूळ गोष्टीतून पूढे निर्माण होणारी (Extension) गोष्ट. ओंकार हे विश्वाचे पहीले दृश्य स्वरूप आहे. आता आपण ओंकाराची निर्मिती कशी होते ते पाहू.


# आकृति क्र.२




आभू मधे प्रचंड वस्तुमान होते त्यामूळे त्याचे गुरूत्वाकर्षणाचे (Gravitational Force) बळ प्रचंड होते. आभूमधून वस्तुमान बाहेर गेले ते पुनः गुरूत्वाकर्षणामूळे मागे वळले व ग च्या आकाराचे झाले. आकृतीत सोयीसाठी पाच ग दाखविले आहेत. पण स्फोट झाल्यानंतर अनेक ग व इतर पॅटर्न तयार झाले असावेत.

सामन्यतः स्फोट झाल्यानंतर जर मूळ वस्तुचे वस्तुमान जर कमी असेल तर तिच्यातून बाहेर पडलेली वस्तु ही मूळ वस्तु पाासून वेगळी होऊन रहाते. जसे सूर्यापाासून ग्रहमाला तयार झाली. पण ह्या लहान आभूमधे प्रचंड वस्तुमान असल्याने त्याचे गुरूत्वाकर्षणाचे (Gravitational Force) बळ प्रचंड होते. त्यामूळे त्याच्यातून काही निसटू शकले नाही.


**आकृति क . ३**




ऊ कार

ग झाल्यानंतर हळू हळू गुरूत्वाकर्षणाचे बळ कमी होऊ लगले . व प्राप्त झालेली गतिमानता व मागील गुरूत्वाकर्षण ह्यांचे संतुलन झाल्याने वस्तु वळसा धालून पूढे गेली मग परत मूळ आभूच्या गुरूत्वाकर्षणामूळे कंसाचे टोक मागे वळाले आणि उलटा कंस झाला व वस्तु मागे येऊ लागली आणि अ कार तयार झाला . आता अ कारा मधून वस्तुमान बाहेर फेकले गेले व पूर्वी प्रमाणे ग कार तयार झाला . तो आडवा असल्याने अ काराला ऊ काराचे रूप प्राप्त झाले .

## आकृति क्र.४




श्री गजानन

वरील आकृतीत गजाननाचे संपूर्ण रूप दाखवले आहे. हाच तो विराट ज्यामधून सर्व विश्व साकारते. हा पॅटर्न आम्ही द्वीमितीत काढाला आहे. पण हे सर्व घडले ते त्रिमितीत. त्यामूळे ऋषिंना गजाननाचे जे रूप दिसले ते काहीसे आजच्या गणेश मूर्ति सारखे असावे. त्यानी ऊ कार व आभू आणि अर्धचंद्र बिंदु सहीत गजानन साकारला.

भौतिक शास्त्राच्या मागोव्याने ओंकार समजून घेण्याचा हा एक अल्प प्रयत्न आहे हे पुनः नमुद कारावेसे वाटते. वास्तविक आधुनिक विज्ञानाला मर्यादा आहेत. भौतिक शास्त्रे प्रत्येक वेळी प्रमाण मागतात. पण अध्यात्म शास्त्रांत प्रमाण देता येत नाही. तरी पण भौतिक शास्त्राला कमी समजू नये कारण हे शास्त्र प्रामाणिक आहे. एक वेळ अशी येईल की भौतिक शास्त्र देखील ईश्वराचे व निरपेक्ष तत्त्वाचे अस्थित्व मान्य करेल ...

पुनः एकदा ह्या चिंतनाचे सिंहावलोकन करूया ...

- मूळ अव्यक्तातून एक आभू तयार झाला
- आभू पासून अर्धचंद्र झाला
- अर्धचंद्र आणि आभू मिळून मकार महेश झाला
- अर्धचंद्रा पासून ऊ कार झाला
- ऊ कार आणि मकार मिळून ओंकार स्वरूप गजानन झाला

हे परब्रह्म असून विश्वाचे आदि बीज आहे. हाच भाव श्री ज्ञानेश्वर माऊली प्रगट करतात तो असा ... (ज्ञानेश्वरी अ.१ श्लोक ११ व १२)

अकार चरण युगुल ऊकार उदर विशाल
मकार महामंडळ मस्तकाकारे
ते तिन्ही एकवटले तेथे शब्द ब्रह्म कवळले
ते मिया गुरूकृपा नमिले आदिबीज

# श्री ज्ञानेश्वरजींना दिसलेले गजाननाचे रूप

आम्ही ॐ ओकारात थोडेसे फेरफार करून श्री ज्ञानेश्वरांना दिसलेले गजाननाचे रूप दाखवण्याचा जो प्रयत्न केला आहे तो भाविकांना आवडेल ...



**ॐ गं गणपतये नमः एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डायधीमहि तन्नो दन्ती प्रचोदयात्**

**भावार्थ ः**
ॐ गं बीज मंत्र स्वरूप गणपतिला माझा नमस्कार असो. आता आम्ही एकदंताला जाणतो. त्या वक्रतुंडाचे चिंतन करतो. तो दंती आम्हाला प्रेरणा देवो.

**विवेचन ः**
आता ऋषि गजाननाला बीज मंत्र 'ॐ गं गणपतये नमः' म्हणून आपल्याला प्रेरणा देण्याची प्रार्थना करतात. आतापर्यत ऋषिंनी गजाननाचे स्वरूप स्पष्ट केले. त्याची कृपा याचना केली. त्याच्या विराटातील विभूत्या सांगितल्या. जीव जगत आणि गजानन तत्वाचे ऐक्य प्रस्थापित केले. त्याचे ओंकार स्वरूप सांगून पार्थिव सगुण रूपही दाखवले.

एकदंत म्हणजे मायेचा स्वामी. वक्रतुंड म्हणजे दुष्कृतांचा नाश करणारा असा गजानन. ऋषि प्रार्थना करतात की हा दुष्कृतांचा नाश करणारा असा गजानन आम्हाला सतत ध्यान करण्याची प्रेरणा देवो व ध्यानाद्वारे त्याचे स्वरूप आम्हाला अनुभवास येवो.

**एकदन्तं चतुर्हस्तं पाशमङ्कुशधारिणम् रदं च वरदौ हस्तैर्बिभ्राणम् मूषकध्वजम्**
**रक्तं लंबोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससौ रक्तगन्धानुलिप्ताङ रक्तपुष्पै सुपूजितम्**
**भक्तानुकम्पिनं देवं जगत्कारणमच्युतम् आविर्भूतं च सृष्टयादौ पुरूषात् परम्**
**एवं ध्यायति यो नित्यौ स योगी योगिनां वरः**

**भावार्थ ः**
गजाननला एकच बाहेर दिसणारा (उजवा) दात आहे. त्याला चार हात आहेत. (उजव्या) हातात पाश नावाचे आयुध आहे. (डाव्या) हातात अंकुश नावाचे आयुध आहे. तर (दूसऱ्या उजव्या) हाताने वरमुद्रा धारण केली आहे व सांगतो आहे की

भिऊ नकोस. त्याच्या ध्वजावर उंदराचे चिन्ह आहे. सिंदूरचर्चित असे लाल वर्णाचे त्याचे उदर आहे. त्याचे कान सुपासारखे विशाल आहेत. रक्तचंदनाची लाल उटी सर्वांगाला लावली आहे. लाल फुलांनी त्याचे पूजन केले गेले आहे. भक्तांवर अनुकंपा असणारा हा परमेश्वर जगाचे आदिकारण असून अढळ आहे. सर्व गोचर अगोचर सृष्टीचा हा आदिकारण आहे असा भाव ठेऊन जो त्याचे ध्यान करतो तो सर्व योगियांमधे श्रेष्ठ असा योगी होय.

**विवेचन ः**

ऋषि गजाननाच्या पार्थिव प्रतिमेचे मनोहारी वर्णन करतात व अंती पुनः जाणीव करून देतात की सर्व गोचर अगोचर सृष्टीचा हा आदिकारण असा हा गजानन वास्तविक सगुण साकार गोचर नसून निर्गुण निराकार अगोचर असे निरपेक्ष ब्रह्म तत्त्व आहे ह्याचे भान साधकाने ठेवावे व मग त्याची सगुण उपासना करावी. भक्ति विग्रहाची करावी पण निर्गुण स्वरूपाचे भान ठेऊन ... हा ऋषिंचा अभिप्राय आहे.

आता ह्यानंतर ऋषि शेवटी गजाननाची आठ नावे घेऊन त्याला नमन करून उपनिषदाची समाप्ति करतात.

**नमो व्रातपतये नमो गणपतये नमः प्रमथपतये नमस्तेऽअस्तु लम्बोदराय**
**एकदन्ताय विघ्ननाशिने शिवसुताय वरदमूर्तये नमः ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः**

**भावार्थ ः**

व्रातपति गणपति प्रमथपति लम्बोदर एकदन्त विघ्ननाशिन् शिवसुत वरदमूर्ति अशा गणपतिला माझा नमस्कार असो. अधिभौतिक अधिदैविक व अध्यात्मिक असे तीन प्रकारचे आमचे ताप नष्ट होवोत.

**विवेचन ः**

आता आपण गणपतिच्या आठ नावांचा अर्थ बघुया ...

## गणपतिच्या आठ नावांचा अर्थ

| क्रमांक | नाव | अर्थ |
|---|---|---|
| १ | व्रातपति | व्रात म्हणजे सर्व जगतांचा समुदाय. ह्या विश्वाचा अधिपति तो व्रातपति. |
| २ | गणपति | गणना (countable) करता येईल अशा सर्व चराचर सृष्टीचा अधिपति तो गणपति. |
| ३ | प्रमथपति | प्रमथ म्हणजे शिव गण. शिवगणांचा अधिपति तो प्रमथपति. |
| ४ | लंबोदर | अकार स्वरूप अशा ज्याच्या विशाल उदरातून सर्व विश्वाची उत्पत्ति होते तो लंबोदर. |
| ५ | एकदंती | एक म्हणजे माया व दंती म्हणजे नाश करणे. मायेचा नाश करणारा तो एकदंती. |
| ६ | विघ्ननाशिन् | सर्व अधिभौतिक अधिदैविक व अध्यात्मिक विघ्नांचा नाश करणारा असा विघ्ननाशिन्. |
| ७ | शिवसुत | सूत म्हणजे पूढचे रूप किंवा पुत्र. शिवाचे पूढचे रूप (Extension) असा शिवाचा पुत्र तो शिवसुत. |
| ८ | वरदमूर्ति | क्षेम स्थैर्य आयुः आरोग्य ऐश्वर्य लाभो असा भक्तांना वर देणारा तो वरदमूर्ति गजानन. |

# उपसंहार

प्रत्येक स्त्रोत्राच्या शेवटी त्या स्तोत्र पठणाचे काय फळ मिळेल हे सांगणारी फलश्रुति असते. पण फळाचे नियोजन करणारा हा ईश्वर हा सर्वज्ञ असतो. तो जाणतो की काय फळ द्यायचे. ते फळ आपल्याला प्राप्त होतेच. हा भाव धरून फलश्रुति वर चिंतन केले नाही. पण प्रार्थना मात्र जरूर करतो ...

हे गजानना

सर्व प्राणिमात्र सुखी होवोत

सर्वांना निरामय आरोग्य लाभो

तुझी कृपादृष्टी सर्वांवर असो

सर्वांचे क्लेश नष्ट होवोत

सर्व चराचरात शांति समृद्धी व समतोल राहो

सर्व प्राणिमात्रांत परस्पर प्रेम मैत्री वृद्धिंगत होवो

सर्वांचे अधिभौतिक अधिदैविक व अध्यात्मिक ताप नष्ट होवोत.

ॐ तद् सद्